लोकसत्ता पृ-५.१.

# कळंब समुद्रात तरुणाचा बुडून मृत्यू

## दोघांना वाचविण्यात यश

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई:** वसईच्या कळंब समुद्रकिनाऱ्यावर तीन तरुण पाण्यात बुडाले. त्यापैकी दोघांना वाचविण्यात स्थानिकांना यश आले. मात्र स्वप्निल बावकर (२१) या तरुणाचा मृत्यू झाला. सोमवारी सकाळी स्वप्निलचा मृतदेह वसईच्या भुईगाव किनाऱ्यावर आढळला.

नालासोपारा पूर्वेच्या तुळिंज येथे राहणाऱ्या तरुणांचा एक गट रविवारी दुपारी नालासोपारा येथील कळंब समुद्रकिनाऱ्यावर क्रिकेट खेळण्यासाठी गेला होता. क्रिकेट खेळल्यानंतर दुपारी स्वप्निल बावकर हा समुद्रात आंघोळीसाठी उतरला. मात्र पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तो बुडू लागला. त्याने मदतीचा धावा करताच त्याचे दोन मित्र त्याला वाचविण्यासाठी



समुद्रात गेले; परंतु तेसुद्धा बुडू लागले. स्थानिक मच्छीमारांना ही माहिती मिळताच त्यांनी समुद्रात धाव घेतली आणि दोघांना बाहेर काढले. मात्र स्वप्निल पाण्यात वाहून गेल्याने तो सापडला नव्हता. दिवसभर त्याचा शोध सुरू होता. दरम्यान, सोमवारी सकाळी वसईच्या भुईगाव समुद्रकिनाऱ्यावर स्वप्निलचा मृतदेह आढळला. स्थानिकांनी वाचवलेल्या एका मुलावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी अपमृत्यूची नोंद केल्याची माहिती वसई पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक राहुल फड यांनी दिली.

मागील आठवड्यात रविवार, १२ मार्च रोजी विरारच्या अर्नाळा येथील समुद्रात नालासोपाऱ्यात राहणाऱ्या रोशन लक्ष्मण गावडे (२३) आणि सौरभ पाल (२२) या दोन तरुणांचा बुडून मृत्यू झाला होता.

# परिमंडळ २ च्या पोलीस उपायुक्तांचे पद रिक्त

## चार महिन्यांपासून नियुक्ती नाही

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसईच्या परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्तपद मागील ४ महिन्यांपासून रिक्त आहे. त्यामुळे



परिमंडळ ३ च्या पोलीस उपायुक्तांकडेच त्याचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात एकूण ३ परिमंडळे आहे. परिमंडळ १ मीरा-भाईंदर शहरात आहे. तर परिमंडळ ३ विरार आणि परिमंडळ २ वसई अशी रचना आहे. संजय कुमार पाटील हे परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त होते. १२ नोव्हेंबर २०२२ रोजी त्यांची बदली झाली. तेव्हापासून ते पद रिक्त आहे. ४ महिने उलटूनही नवीन उपायुक्तांची नियुक्ती करण्यात आलेली नाही. मीरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयात नवीन महिला उपायुक्तांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याला देखील १५ दिवस उलटून गेले. मात्र परिमंडळ २ चे पद रिक्तच आहे. परिमंडळ २ चा अतिरिक्त कार्यभार परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त सुहास बावचे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

Scanned with CamScanner



# माणिकपूरमध्ये बांधकामाचा सज्जा कोसळला; दोन जखमी

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** वसई पश्चिमेच्या माणिकपूर येथे बांधकाम सुरू असलेल्या इमारतीचा सज्जा कोसळल्याची घटना सोमवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास घडली. यात इमारतीच्या बाहेर उभ्या असलेल्या रिक्षातील दोन प्रवासी जखमी झाले आहेत.

वसई पश्चिमेच्या माणिकपूर अर्बन बँकेसमोर रिक्षा थांबा आहे. या थांब्याच्या शेजारी एका इमारतीचे बांधकाम सुरू आहे. बांधकाम सुरू असताना अचानकपणे तिसऱ्या मजल्यावरील सज्जा सोमवारी दुपारच्या सुमारास कोसळला. हा थेट खाली रिक्षा थांब्यावर उभ्या असलेल्या रिक्षावर पडला. यात रिक्षात बसलेले दोन प्रवासी जखमी झाले आहेत. या जखमी प्रवाशांची नावे अजून समजली नसून त्यांना घटनास्थळी असलेल्या नागरिकांनी उपचारासाठी दाखल केले असून पुढील माहिती घेत आहोत असे पोलिसांनी सांगितले आहे.

### बांधकामाची चौकशी करण्याची मागणी

घडलेल्या दुर्घटनेनंतर या बांधकामाबाबत चौकशी करण्याची मागणी भाजपचे महेश सरवणकर यांनी केली आहे. बांधकाम करताना या बांधकामासाठी पालिकेची अधिकृतरीत्या परवानगी घेतली होती का?, या सर्व गोष्टी तपासण्यात याव्यात, असे सरवणकर यांनी सांगितले आहे.

# सनसिटी येथील पोलीस मुख्यालयाचा मार्ग मोकळा

## मिठागराची जागा पाणथळ क्षेत्रातून वगळणार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई:** वसईच्या सनसिटी येथील प्रस्तावित पोलीस मुख्यालयाचा मार्ग मोकळा झाला आहे. येथील आरक्षित जागा मिठागराची असून ती पाणथळ क्षेत्रात येत असल्याने काम रखडले होते. पर्यावरणीय बदल मंत्रालयाच्या एका अधिसूचनेनुसार ही जागा पाणथळ क्षेत्रातून वगळण्यात येणार आहे. तसा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी सादर केले आहे.

वसईच्या सनसिटी येथे पोलीस आयुक्तालयाचे मुख्यालय आणि कवायत मैदान प्रस्तावित आहे. ७ जुलै २००५ मध्ये सिडकोने ६ शासकीय कार्यालयासाठी दिवाणमान (सनसिटी) येथील भूमापन क्रमांक १७६मध्ये जागा आरक्षित करण्यात आली होती. त्यामध्ये पोलीस विभागासाठी आरक्षण क्रमांक ५१२ नुसार एक लाख २०,२२ चौ.मी जागा आरक्षित होती. या जागेवर पोलीस परेड आणि पोलीस वसाहत तयार करण्यात येणार आहे. ही जागा जागा पोलीस विभागास हस्तांतरीत करावी असा प्रस्ताव महसूल विभागास देण्यात आला होता. २०२१ मध्ये जागेची मोजणी करून एकत्रित अहवाल तयार करण्यात आला होता. या जागेपैकी १.६२ हेक्टर जागा ही सॉल्ट मार्श असून ९.२० हेक्टर क्षेत्र हे साल्ट पॅन जागा मिठागर होती. त्यामुळे काम रखडले होते. पर्यावरण व वने मंत्रालयाच्या २६ सप्टेंबर २०१७ च्या अधिसुचनेच्या नियम क्रमांक २ नुसार सॉल्ट पॅन मिठागर असलेल्या जागा या पाणथळ क्षेत्रातून वगळण्यात येते. त्यानुसार सविस्तर अहवाल पालघरच्या जिल्हाधिकाऱ्यांना देण्याबाबत कळविले होते. त्याप्रमाणे ६ मे २०२२ रोजी अहवाल पर्यावरण विभागाला सादर केला असून पर्यावरण मंत्रालयाच्या विचाराधीन आहे. पर्यावरण, वन आणि वातावरणीय बदल विभागाने साल्ट पॅन पर्यावरण मंत्रालयाकडून परवानगी मिळाल्यानंतर या जागेवर पोलीस मुख्यालय आणि कवायत मैदान तयार केले जाणार आहे, अशी माहिती राज्याचे पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांनी दिली.

### पोलीस मुख्यालय कसे असेल?

पोलीस मुख्यालयासाठी वसई पश्चिमेच्या सनसिटी येथे २७ एकर जागा प्रस्तावित आहे. या मुख्यालयात प्रशासकीय इमारत, शस्त्रास्त्र विभाग, मोटार वाहतूक, आदी विविध विभाग असणार आहेत. याशिवाय दररोज होणारे पोलीस कवायत, पोलीस भरती प्रशिक्षण केंद्र, सराव केंद्र आदी असणार आहे. मुख्यालय हे पोलीस आयुक्तालयासाठी बॅकअप म्हणून कार्यरत राहणार आहे. त्यात गृहरक्षक (होमगार्डस), राज्य राखीव सुरक्षा बल (एसआरपीएफ), दंगल नियंत्रण पथक तैनात करण्यात येणार आहे. शस्त्रगार विभागात पोलिसांना लागणारी हत्यारे आणि दारूगोळा ठेवला जाणार आहे. येथून तो सर्व पोलिसांना पुरविण्यात येणार आहे. पोलीस दलातील वाहनांचे वितरण, वाहनांची दुरूस्ती मोटर वाहन विभागात केली जाणार आहे. पोलिसांच्या शस्त्र सरावासाठी शूटीग रेंज देखील तयार केले जाणार आहे.

# मीरा-भाईंदरच्या आदिवासींची अस्तित्वाची लढाई

## जंगल नष्ट झाल्यामुळे मिळेल ते काम करण्याची नामुष्की

**मयूर ठाकूर, लोकसत्ता**

> “लोक गावाकडून शहरात येतात. मात्र आमच्या गावातच हे शहर येऊन वसले. त्यामुळे जंगलात राहणारे आम्ही या शहराच्या नियमात अजून बसू शकलेलो नाही. आमची मूले अजूनही शिक्षण घेऊन पुढे आलेली नाही. त्यामुळे आमच्याच जमिनीत आम्हाला उकिरड्याची वागणूक दिली जाते. -गीता वाघे, कातकरी आदिवासी महिला (भाईंदर पश्चिम)

**भाईंदर:** पूर्णतः जंगलावर अवलंबून असलेले मीरा-भाईंदर मधील मूळ वारली, कातकरी आणि पारधी समाजाचे आदिवासी नागरिक सध्या आपल्या अस्तित्वाची लढाई लढत आहेत. येथील जंगल नष्ट झाल्यामुळे कचरा विणणे, मजुरी करणे किंवा इतर मिळेल ती कामे करण्याची नामुष्की त्यांच्यावर ओढवली आहे.

गेल्या सात दशकांत संजय गांधी राष्टीय उद्यानाला लागून असलेल्या जंगल भागात मीरा-भाईंदर हे शहर वसले. या जागेत पूर्वी केवळ आगरी, कोळी आणि आदिवासी समाजाचे लोक वास्तव्य करत होते. परंतु मुंबईला लागून असलेल्या या भुभागाला काळानुसार महत्व प्राप्त होऊन याचे जलदगतीने शहरीकरण झाले. याचा सर्वाधिक फटका येथे असलेल्या आदिवासी समाजाला बसला. यात प्रामुख्याने वारली, पारधी आणि कातकरी या आदिवासी समाजाचा समावेश आहे. हा समाज पूर्णतः जंगलावर अवलंबून आहे. यातील कातकरी समाजाचे लोक हे जंगलातील लाकूड आणि मध गोळा करून पूर्वी विकत होते, तर वारली समाजाचे लोक हे शेती आणि पशुपालनाचा व्यवसाय करत होते. याशिवाय पारधी समाजाचे लोक हे वन्य प्राण्यांची शिकारी करून त्यावर आपली उपजीविका भागवत होते. मात्र इंग्रजांनी त्यांच्या (पान ४ वर)

Scanned with CamScanner

लोकमत ५-४-१.

# संप मागे, जुन्या पेन्शनचा प्रश्न कायम

## योजना तत्त्व म्हणून स्वीकारली; मात्र निर्णय समितीच्या शिफारशींनंतरच

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** जुनी पेन्शन योजना लागू करावी ही बाब आम्ही तत्त्व म्हणून स्वीकारत आहोत, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्यानंतर राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी त्यांचा सात दिवसांपासूनचा संप मागे घेतला. सर्व कर्मचारी आज, मंगळवारपासून कामावर रूजू होतील. संप मागे घेण्यात आला असला तरी जुन्या पेन्शनचा प्रश्न मात्र कायमच आहे. कारण ही योजना तत्काळ लागू करण्याचा कोणताही निर्णय सरकारने जाहीर केलेला नाही.

मुख्यमंत्री शिंदे यांनी संपकरी सरकारी, निमसरकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीच्या नेत्यांशी सोमवारी दुपारी विधानभवनातील त्यांच्या दालनात चर्चा केली. जुन्या पेन्शनच्या मागणीवर अभ्यास करण्यासाठी तीन निवृत्त सनदी अधिकाऱ्यांची समिती राज्य सरकारने नेमली होती, पण अशा समितीचा प्रस्ताव संपकरी संघटनांनी आधी धुडकावून लावला होता. तथापि, मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेनंतर हा प्रस्ताव संघटनांनी स्वीकारला. समिती तीन महिन्यांत राज्य सरकारला अहवाल देईल. या समितीसमोर संपकरी संघटना त्यांची बाजूही मांडणार आहेत. जुनी पेन्शन योजना लागू केल्याची आधी घोषणा करा, तरच संप मागे घेऊ ही भूमिका मवाळ करत संपकरी संघटनांनी समितीचा पर्याय स्वीकारला आहे.

मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव बैठकीला उपस्थित होते. १४ मार्चपासून राज्यातील क आणि ड वर्ग कर्मचारी संपावर होते आणि त्यांनी अभूतपूर्व एकी दाखविली. सरकारी कामकाज अनेक ठिकाणी कोलमडले होते. सरकारच्या उत्पन्नावरही विपरीत परिणाम झाला. अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीचे पंचनामे अडले होते.




### सर्वसामान्यांच्या कामांचा प्रश्न मिटला

जुन्या पेन्शन योजनेसाठी कर्मचाऱ्यांचे सातव्या दिवशी आंदोलन सुरु होते. सायंकाळी सरकारच्या आश्वासनानंतर संप मिटला. त्यामुळे सरकारी कर्मचारी कार्यालयांमध्ये परततील. मंगळवारपासून कामे सुरु होतील. त्यामुळे आता सर्वसामान्यांचे सरकारी कार्यालयांतील कामे, आरोग्यसेवा यांचाही प्रश्न मिटला आहे. (छाया : सुशील कदम)

### संपकऱ्यांचे नेते काय म्हणाले?

समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी मुख्यमंत्र्यांशी चर्चेनंतर पत्रकारांना सांगितले की, आमची बोलणी यशस्वी झाली. जुनी पेन्शन योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याचा सरकार गंभीरपणे विचार करत आहे. माहिती मिळवण्यासाठी व त्यातून निर्णय घेण्यासाठी समिती नेमलेली आहे. तत्त्व म्हणून सरकारने जुन्या पेन्शन योजनेची भूमिका स्वीकारली आहे. जुन्या व नवीन योजनेतील आर्थिक अंतर नष्ट करून सर्वांना समान निवृत्तिवेतन मिळेल, असे लेखी आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.

### अधिकाऱ्यांचा नियोजित संप मागे

१ राजपत्रित अधिकारी महासंघाने २८ मार्चपासून जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीसाठी संपावर जाण्याचा निर्णय घेतला होता, पण जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे कर्मचाऱ्यांना आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेची हमी देण्याचे धोरण तत्त्व म्हणून राज्य सरकारने स्वीकारले आहे.

२ त्यातच गारपीट व आरोग्यसेवा विस्कळीत झाली असल्याने संप मागे घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री शिंदे यांनी केले. या दोन्ही बाबी लक्षात घेऊन नियोजित संप मागे घेत असल्याचे राजपत्रित अधिकारी महासंघाचे नेते ग. दि. कुलथे यांनी जाहीर केले.

**मुद्दा काय होता... :** राजपत्रित अधिकारी महासंघासोबतच्या बैठकीच्या इतिवृत्तात म्हटले की, नवीन पेन्शन योजना रद्द करून सर्वांना जुनी पेन्शन योजना पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणे हा अजेंडा होता.

**निर्णय काय झाला? :** जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेची हमी देणारे धोरण मान्य करण्यात आले.

### मुख्यमंत्री काय म्हणाले?

मुख्यमंत्री शिंदे यांनी संपकरी संघटनांशी चर्चेनंतर विधानसभेत निवेदन केले. ते म्हणाले की, कर्मचाऱ्यांच्या जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीबाबत राज्य शासन पूर्णतः सकारात्मक असून, यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीचा अहवाल लवकरात लवकर प्राप्त करून त्यावर योग्य निर्णय घेण्यात येईल. राज्यासमोर असलेल्या आव्हानांचा विचार करता राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचाऱ्यांनी संवेदनशीलतेने संप मागे घेतला. त्यांच्या निर्णयाचे मी स्वागत करतो. जुन्या पेन्शन योजनेची मागणी मान्य करण्यात आल्याचा कोणताही उल्लेख मुख्यमंत्र्यांच्या निवेदनात नव्हता.

### संपाचा कालावधी अर्जित रजा

संपात सहभागी झाल्याबद्दल जारी केलेल्या नोटिसा मागे घेण्यात येतील. तसेच संपाचा कालावधी हा अर्जित रजा मानला जाईल हे मुख्यमंत्री शिंदे यांनी सोमवारच्या बैठकीत मान्य केले.

संवादातून मार्ग निघतो आणि तो संवाद आम्ही केला. संप मागे घेतल्याबद्दल मी आभार व्यक्त करतो. आज दुपारीच माझी मुख्यमंत्री शिंदे यांच्याशी चर्चा झाली होती. आडमुठी भूमिका न घेता आम्ही कर्मचाऱ्यांची भूमिका समजून घेतली. आता चर्चेच्या मुद्द्यांवर तीन सदस्यांची समिती निर्णय घेईल.

- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

Scanned with CamScanner

पुण्यनगरी ५-४-९

# कळंब समुद्रात एकाचा बुडून मृत्यू, तर एकाला वाचवण्यात यश

**। वसई :** वसईच्या कळंब समुद्रकिनाऱ्यावर फिरायला गेलेले तरुण पाण्यात उतरले, मात्र त्यांना पाण्याचा अंदाज न आल्याने दोन जण बुडाले. त्यातील एकाचा बुडून मृत्यू झाला असून एकास स्थानिक मच्छीमारांनी वाचवले. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रविवारी रात्रीची ही घटना आहे.

नालासोपारा तुळींज येथे राहणारा साहिल बावकर या २१ वर्षांच्या युवकाचा समुद्रात बुडून मृत्यू झाला असून त्याचा मृतदेह बाहेर काढण्यात स्थानिक मच्छीमार व अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. साहिल संजय बावकर रविवारी आपल्या मित्रांसोबत कळंब समुद्रकिनारी फिरायला आला असता तो पाण्यात उतरला. पाण्याचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाला.त्याच्यासोबत खामकर नावाचा तरुण बुडत असताना त्याला वाचवण्यात स्थानिकांना यश आले. रविवारी रात्रीपासून साहिलचा शोध जीवरक्षक शोध घेत होते. मात्र तो सापडला नव्हता. सोमवारी सकाळी कळंब येथील रमेश किणी, अभिजीत किणी यांना या तरुणाचा जाळ्याला अडकलेला मृतदेह दिसताच त्यांनी लहान बोटीच्या मदतीने भुईगाव समुद्रकिनारी आणून तो पोलिसांच्या ताब्यात दिला. वसई पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# बागेश्वर धाम बाबांच्या कार्यक्रमात चोरांचा सुळसुळाट

## एकाच दिवशी ३६ चोरीच्या घटना

**। मीरा रोड :** धीरेंद्र कृष्ण शास्त्री महाराज (बागेश्वर धाम सरकार, मध्य प्रदेश) यांचा सालासर सेंट्रल पार्क मैदान, मीरा रोड पूर्व येथे श्रीमती शांताबेन मिठालाल जैन चॅरिटेबल ट्रस्टने दोन दिवसांचा दिव्य दर्शन कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात पहिल्या दिवशी चोरांचा सुळसुळाट पाहायला मिळाला. चोरांनी तब्बल ३६ महिलांचे मंगळसूत्र, सोनसाखळी चोरीला गेल्याच्या घटना घडल्या. याप्रकरणी मीरा रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी चोरी करणाऱ्या सहा महिलांना ताब्यात घेतले आहे. दरम्यान, या कार्यक्रमाला काही संघटनांनी विरोध केला आहे. या कार्यक्रमासाठी मुंबई, ठाणे, पालघर व इतर जिल्ह्यातून आलेल्या नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. एवढ्या मोठ्या संख्येने एकत्र नागरिक आल्यामुळे शहरात सगळीकडे वाहतूक कोंडी झालेली पाहायला मिळाली. तसेच कार्यक्रम ठिकाणी ठेवलेला पोलिसांचा बंदोबस्तही अपुरा पडला आहे. कार्यक्रम ठिकाणी नागरिकांनी गर्दी केल्यामुळे चेंगराचेंगरी झाली व नागरिक खाली पडून जखमी झाले आहेत. तसेच चोरांनी गर्दीचा फायदा घेत अनेक महिलांचे सोन्याचे दागिने चोरी केले. रात्री उशिरापर्यंत मीरा रोड पोलीस ठाण्यात ३६ महिलांनी त्यांचे दागिने चोरी झाल्याचे गुन्हे दाखल केले आहेत. यामध्ये महिलांचे मंगळसूत्र व सोनसाखळी चोरी झाली आहे. जवळपास ४९८ ग्रॅम वजनाचे दागिने असून त्यांची किंमत अंदाजे ४ लाख ९७ हजार रुपये आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तपास करून दागिने चोरी करणाऱ्या ६ महिलांना ताब्यात घेतले असल्याचे सांगितले आहे. बागेश्वर धाम दरबारात आलेल्या व ज्यांचे दागिने चोरी झाले त्या महिलांनी सांगितले की, आमचा प्रश्न तर सुटला नाही, उलट आमच्या दागिन्यांची चोरी झाली आहे. काही लोकांचे पाकीट चोरीला गेल्याचे सांगितले जात आहे.

लोकमत ५-४-९

# 'स्पा'आड वेश्याव्यवसाय चालविणारे दोघे अटकेत

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडच्या पेणकरपाडा भागात स्पा मसाजच्या आड वेश्या व्यवसाय चालवणाऱ्या दोघांना पोलिसांनी अटक केली असून दोघांचा शोध सुरू आहे.

अनैतिक मानवी वाहतूक भाईंदर शाखेचे पोलिस निरीक्षक समीर अहिरराव यांना रेस्क्यू फाउंडेशनच्या अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार पेणकरपाडा येथील सी मॅजिक ऑर्केस्ट्रा बारच्या जवळ असलेल्या स्टेटस स्पा मध्ये मसाजच्या आड वेश्या व्यवसाय चालवला जातो. अहिरराव यांनी उमेश पाटील, विजय निलंगे, केशव शिंदे, अश्विनी भिलारे, सम्राट गावडे, सोनाली मोरे यांच्या पथकासह सापळा रचून बोगस गिऱ्हाईक स्पा मध्ये पाठवले. सात हजार रुपयांच्या मोबदल्यात वेश्या व्यवसायास तरुणी पुरवली जात असल्याची खात्री होताच पोलिस पथकाने छापा टाकला. स्पा चा व्यवस्थापक प्रदीप राजोरीया आणि कर्मचारी छोटू कुमार उर्फ लोकेश यादव या दोघांना यावेळी अटक करण्यात आली. काशीमीरा पोलिस ठाण्यात १९ मार्चला गुन्हा दाखल झाला असून चालक शीतल कोळी (रा. गोरेगाव) व जागा मालक दिनेश अमीन (रा. कांदिवली) या आरोपींचा पोलिस शोध घेत आहेत. तीन पीडित तरुणींची सुटका केली असून ७० हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.


Scanned with CamScanner

सकाळ पु. पा. १

... महापालिका बसवणार एअर एक्झास्ट यंत्रणा

# स्मशानातून निघणाऱ्या धुरापासून मुक्ती

भाईंदर, ता. २० (बातमीदार) : स्मशानभूमीत मृतदेहावर अंत्यसंस्कार करताना मोठ्या प्रमाणावर धूर निर्माण होत असतो. हा धूर उंच चिमणीद्वारे बाहेर गेला नाही, तर स्मशानात आलेल्या लोकांना तर त्रास होतोच; शिवाय आसपासच्या रहिवाशांना प्रचंड मनस्ताप सोसावा लागतो. यासाठी स्मशानभूमींमध्ये एअर एक्झॉस्ट सिस्टीम बसवण्याचा निर्णय मिरा-भाईंदर महापालिकेने घेतला आहे. ही यंत्रणा चार स्मशानभूमींमध्ये कार्यान्वित केली जाणार आहे.



महापालिकेच्या भाईंदर पश्चिम येथील स्मशानभूमीमध्ये गॅस शवदाहिनी उपलब्ध असली, तरी बहुतांश मृतदेहांवर लाकडाच्या साह्यानेच अंत्यसंस्कार करण्याकडे नातेवाईकांचा कल असतो. लाकडे जाळल्यामुळे प्रचंड धूर निर्माण होतो. या धुरात राखेच्या कणांचाही समावेश असतो. भाईंदर पश्चिम येथील स्मशानभूमीतील शेगड्यांच्या वरती बसवण्यात आलेल्या चिमण्या योग्य रीतीने काम करत नसल्यामुळे सध्या धूर स्मशानभूमीतच पसरत आहे. त्याना खूपच त्रास होत आहे. शिवाय स्मशानभूमीच्या चारही बाजूला नागरी वस्ती असल्यामुळे त्या ठिकाणच्या रहिवाशांनाही त्याचा कायम त्रास सोसावा लागतो; मात्र लवकरच हा त्रास दूर होणार आहे.

भाईंदर पश्चिमसह उत्तन, गोडदेव व पेणकर पाडा या चार ठिकाणी असलेल्या स्मशानभूमींमध्ये एअर एक्झॉस्ट यंत्रणा बसवण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. यासाठी सुमारे साडेसात कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून त्याची तरतूद आगामी अर्थसंकल्पात केली आहे. याआधी भाईंदर पूर्व येथील बंदरवाडी, काशी मिरा व मिरा रोड येथील स्मशानभूमीत ही यंत्रणा बसवण्यात आली आहे.

## अशी आहे यंत्रणा

एअर एक्झॉस्ट यंत्रणेत धूर खेचून घेणारे हुड प्रत्येक शवदाहिनीवर बसवण्यात येणार असून त्यांना झडपा असणार आहेत. हे सर्व हूड एकमेकांना जोडलेले असणार आहेत. ज्या वेळी मृतदेहावर अंत्यसंस्कार सुरू होतील त्या वेळी या झडपा उघडल्या जातील आणि हुडमध्ये बसवण्यात आलेले पंप धूर ओढून घेतील. त्यानंतर हा धूर यंत्रणेत असलेल्या स्क्रबरमध्ये जाणार आहे. त्या ठिकाणी असलेल्या पाण्यात धुरामध्ये असलेले राखेचे कण शोषून घेतले जातील व स्वच्छ धूर बाहेर टाकला जाईल. हा धूर शंभर फूट उंच असलेल्या चिमणीद्वारे आकशात सोडला जाणार आहे. या यंत्रणेमुळे आसपासच्या रहिवाशांना होणारा धुराचा त्रास कमी होणार आहे तसेच प्रदूषणही कमी होणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात आली.

---

सकाळ पु. पा. २

# स्वच्छतागृहांसाठी 'टमरेल' आंदोलन

## विरारमधील आदिवासी पाड्यांतील नागरिक आक्रमक

विरार, ता. २० (बातमीदार) : शहरातील आदिवासी पाड्यांवर सार्वजनिक शौचालयाच्या मागणीसाठी महिलांनी टमरेल घेऊन अनोखे आंदोलन सुरू केले आहे. आपल्या मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी श्रमजीवी संघटनेच्या महिला आंदोलकांनी हातात टमरेल घेऊन थेट महानगरपालिका मुख्यालयात धडक दिली. शौचालय मिळत नसेल तर महानगरपालिकेचे शौचालय वापरणार, अशी आंदोलक महिलांनी भूमिका घेतल्यामुळे महापालिका प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली. या आंदोलनात वसई तालुका सचिव दिलीप लोंढे, विरार शहर प्रमुख विद्या गिराणे, ज्येष्ठ कार्यकर्ते कमलाकर हरवटे आणि संघटनेच्या महिला सहभागी होत्या.

संघटनेच्या कार्याध्यक्षा ॲड. स्नेहा दुबे-पंडित यांनी प्रशासनाला जाग आणण्यासाठी 'टमरेल' आंदोलन करण्याबाबत आदिवासी पाड्यातील महिलांना प्रोत्साहित केले होते.



विरार : आदिवासी पाड्याती महिलांनी पालिकेवर 'टमरेल' मोर्चा काढला

### १५ दिवसांत शौचालय बांधून देणार

विरार शहरातील राणी तलाव, फुलपाडा, कातकरी पाडा तसेच जाधव पाडा या आदिवासी पाड्यांमध्ये नागरिकांना स्वच्छतागृहांची व्यवस्था नाही. जी स्वच्छतागृहे आहेत त्यांची दुरवस्था झाल्याने महिलांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. याबाबत अनेकवेळा तक्रारी विनंती करूनदेखील प्रशासन लक्ष देत नसल्यामुळे श्रमजीवी संघटनेच्या माध्यमातून महिलांनी अनोखे आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधले. या वेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अजिंक्य बगाडे यांना निवेदन देण्यात आले. १५ दिवसांत शौचालय बांधून देणार, असे आश्वासन या वेळी मोर्चाला अतिरिक्त आयुक्त अजिंक्य बगाडे यांनी दिले. मात्र १५ दिवसांत काम झाले नाही तर दररोज महापालिकेच्या मुख्यालयात शौचासाठी येणार असल्याचे आंदोलकांनी जाहीर केले आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पा.नं.५.

# किसान मोर्चा पुन्हा आंदोलनाच्या पवित्र्यात

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

केंद्र सरकारने दिलेले लिखित आश्वासन पाळले नाही तर तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा संयुक्त किसान मोर्चाने दिला. आंदोलन केल्याशिवाय शेतकऱ्यांना 'एमएसपी' कायदा मिळणार नाही, असा दावा देखील करण्यात आला. सोमवारी दिल्लीतील रामलीला मैदानावर 'किसान महापंचायत'चे आयोजन करण्यात आले.

महापंचायतदरम्यान शिष्टमंडळाने केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्र सिंह तोमर यांच्याशी चर्चा केली. दर्शन पाल, जोगिंदर सिंह उगराहा, युद्धवीर सिंह यांच्यासह १५ शेतकरी नेते चर्चेदरम्यान उपस्थित होते. ३० एप्रिलपर्यंत सरकारने मागण्या मान्य केल्या तर आंदोलन मागे घेतले जाईल. अन्यथा पुढील रणनीती आखली जाईल, अशी माहिती शेतकरी नेत्यांनी या बैठकीनंतर महापंचायतमध्ये दिली. एमएसपी हमी कायदा, शेतकरी आंदोलनादरम्यान शहीद झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत, शेतकरी नेत्यांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घ्या, केंद्रीय मंत्री अजय मिश्रा टेनी यांना हटवण्याच्या मागणीसह वीज संशोधन विधेयकावर बैठकीत चर्चा झाली. सरकारने मागण्या मान्य केल्या नाही तर येत्या २० ते २१ दिवसांमध्ये मोठे आंदोलन उभारू, असा इशारादेखील त्यांनी दिला. शेतकऱ्यांना एमएसपी हमी हवी आहे. ती न दिल्यास २०२४ मध्ये भाजपला परिणाम भोगावे लागतील, असा इशारा शेतकरी नेते राकेश टिकैत यांनी दिला.

## महापंचायतमधील महत्त्वाचे मुद्दे

- केंद्र सरकारने ९ डिसेंबर २०२१ रोजी संयुक्त किसान मोर्चाला दिलेले लिखित आश्वासन पूर्ण करण्याचे तसेच शेतकऱ्यांसमोरील वाढत्या संकटांचे निराकरण करण्यासाठी प्रभावी पावले उचलण्याची मागणी महापंचायतमधून करण्यात आली.
- स्वामिनाथन आयोगाच्या शिफारसीनुसार सर्व पिकांना सी २+५० टक्के सूत्रानुसार 'एमएसपी'वर खरेदीची हमी देण्यासाठी कायदा आणवा आणि लागू करावा. सर्व शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्ती तसेच खतांसह लागवड किमतीमध्ये घट करण्याची मागणी एसकेएमने केली आहे.



- शेती सुधारणा कायद्याविरोधात एक वर्षाहून अधिक काळापर्यंत शेतकऱ्यांनी आंदोलन केले होते. आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याचे तसेच 'एमएसपी' संबंधी स्थापन केलेली समिती बरखास्त करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली.

पुढारी पु.पा.३.

## पिस्टल विक्री; एकास अटक

**मिरारोड :** नयानगर पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करत असतांना पोलिसांना ईशा वाईन्स शॉपजवळ एक इसम पिस्टल घेवून येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार वरिष्ठांना माहिती देऊन त्या इशा वाईन्सजवळ पोलीस पथक सापळा लावुन थांबले असता तेथे एक इसम आला त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता रोहीत शिवा भुतानी असे त्याचे नाव आहे. तो सुरत , गुजरात येथून आला असल्याचे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे २० हजार रुपये किंमतीचे एक लोखंडी धातुचे देशी बनावटीचे पिस्टल, अग्नीशस्त्र मिळुन आले. त्याला अग्नीशस्त्र बाळगण्याचा अधिकृत परवाना मागितला असता त्याने त्याचेकडे कोणताही परवाना नसल्याचे तसेच हे पीस्टल विक्री करण्यासाठी घेवुन फिरत असल्याचे सांगीतले. रोहीत शिवा भुतानी याने अग्नीशस्त्र विनापरवाना बाळगुन पोलीस आयुक्तालय यांचा मनाई आदेश असताना मनाई आदेशाचा भंग केला म्हणुन त्याच्या विरुध्द शस्त्र अधिनियम कलमासह, महाराष्ट्र पोलीस कायदा विविध कलमानुसार नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

पुढारी ५.४.२३.

# पोलिसांची विश्वासार्हता कामातून जपली जावी -पो.महा संचालक रजनीश शेठ



**वसई :** सर्व सामान्य माणसाला त्याच्यावर होणाऱ्या अन्याय निवारणासाठी पोलिसांकडून न्याय मिळेल हा विश्वास असतो. पोलिसांनी आपल्या जबाबदारीच्या कर्तव्यातून या सामान्य माणसाचा विश्वास जपण्यासाठी त्याच्या तक्रारींची दखल घ्यायला हवी, इतकेच नाही तर ती तक्रार योग्य प्रकारे हाताळण्याचा प्रयत्न पोलिस स्थानकाच्या कामातून केला जावा, असा प्रयत्न होईल. पोलिसांची भूमिका ही पक्षपात करणारी नसावी, असे प्रतिपादन पोलिस महासंचालक रजनीश शेठ यांनी नायगाव पोलिस ठाण्याच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना केले. नायगाव पोलिस ठाण्याचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाचे पोलिस आयुक्त मधुकर पांडे, अप्पर पोलिस आयुक्त श्रीकांत पथक, पोलिस उपायुक्त सुहास बावचे, खा.राजेंद्र गावित व इतर मान्यवर उपस्थित होते. नागरीकांच्या तक्रारीची योग्य दखल घेणे गरजेचे असून परिसरातील नागरीकांच्या तक्रारीचे निवारण नजिकच्या पोलिस स्थानकातून व्हावे, यासाठी या पोलिस ठाण्याची निर्मिती असल्याचे सांगण्यात आले. या पोलिस ठाण्याचे वरीष्ठ पोलिस निरीक्षक रमेश भामे हे असणार आहेत. या पोलिस ठाण्यात २ पोलिस निरीक्षक, १४ पोलिस अधिकारी व ४३ पोलिस कर्मचारी असणार आहेत.

## वसईत स्वागतयात्रेचे आयोजन

**वसई :** आमची वसईतर्फे नववर्षाच्या स्वागतासाठी सर्वात लांब पल्ल्याच्या स्वागतयात्रेचे प्रतिवर्षी आयोजन करण्यात येते. यंदा बुधवार दि.२२ मार्च रोजी आमची वसई तर्फे वसईचा गुढीपाडवा कार्यक्रमासह स्वागतयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीमंत नरवीर श्री चिमाजी आप्पा पेशवे व हजारो मराठ्यांच्या पराक्रमाने पावन झालेल्या वसई किल्ल्यातील ऐतिहासिक श्री नागेश महातीर्थ येथून सायंकाळी ०४:३० वाजता ढोल ताशाच्या गजरात गुढी उभारून बाईक रॅली सुरु होइल. वसई किल्ला ते अंबाडी रोड - पंचवटी नाका असा बाईक रॅली मार्ग असेल. सायंकाळी ०५:३० ते ७ पंचवटी नाका ते गुरुद्वारा चालत शोभायात्रा असेल. सायंकाळी ७ ते ९ गुरुद्वारा समोर सांस्कृतिक कार्यक्रम व सांगता होईल. उत्तम वेशभूषा केलेल्या पहिल्या २५ सहभागींना आकर्षक बक्षीस देण्यात येणार आहे. अधिक माहिती व नोंदणीसाठी संपर्क साधावा असे आवाहन अध्यक्ष ऋषिकेश वैद्य यांनी केले आहे.

Scanned with CamScanner

लोकमत

# भाईंदर-वसई परिसरात निघणार २० मिरवणुका

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मीरा-भाईंदर, वसई विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये गुढीपाडवा सण मोठ्या जल्लोषात दरवर्षी साजरा केला जातो. यावर्षी गुढीपाडव्यानिमित्त मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये ५ मिरवणुका, ११ शोभायात्रा, ४ स्वागत यात्रा, अशा एकूण २० मिरवणुकांचे नियोजन करण्यात आले आहे.

गुढीपाडवा, चैत्र पाडवा या दिवसांपासून हिंदूंचे नवीन वर्ष सुरू होत आहे. या सणानिमित्त हिंदू बांधव घरोघरी गुढी उभारत सण साजरा करतात. याचबरोबर अनेक ठिकाणी वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन देखील करण्यात येत असते. त्यात दीपोत्सव, नववर्ष स्वागत यात्रा, शोभायात्रा, प्रभात फेरी आदी कार्यक्रमांचा समावेश असतो. भाईंदर पूर्वेला नवघर पोलिस ठाण्याच्या हद्दीत २ ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विरारमध्ये १ ठिकाणी पूजेचे आयोजन करण्यात आले आहे. सणानिमित्ताने मिरवणूक व कार्यक्रमांच्या संख्येत कमी-अधिक वाढ होण्याची शक्यता असल्याची माहिती यावेळी देण्यात आली आहे.

Hello Vasai
Page No. 1 Mar 21, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# अर्नाळा जेटी येथे अनोळखी व्यक्तीचा मृतदेह

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : अर्नाळा जेटी येथे अनोळखी व्यक्तीचा मृतदेह सापडल्याने खळबळ माजली आहे. अर्नाळा समुद्रकिनारी असलेल्या जेटीजवळ रविवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास पंचवीस वर्षीय अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळून आला होता. याबाबत ग्रामस्थांनी अर्नाळा सागरी पोलिस ठाण्यात कळविल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेहाचा पंचनामा करून शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. अर्नाळा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

Hello Vasai
Page No. 3 Mar 21, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

1997 से

KAT खबरें आज तक

not a publication of the living media india group

वर्ष: 26 अंक-275 मुंबई, मंगलवार 21 मार्च 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# मुसीबत में पड़े लोगों की मदद कर रहा डायल 112

**वसई :**चोरी, सेंधमारी, हत्या, बलात्कार, दुर्घटना, हाथापाई, डकैती या किसी अन्य अपराध के मामले में पीड़ित को सबसे पहले पुलिस की याद आती है। राज्य सरकार ने नागरिकों की मदद के लिए अत्याधुनिक व्यवस्था के साथ डायल सिस्टम सुविधा 112 शुरू की है ताकि पुलिस तत्काल मौके पर पहुंचकर मुसीबत में पड़े व्यक्ति की मदद कर सके. साल 2022 में मीरा भायंदर वसई विरार पुलिस फोर्स की टॉप थीं। शुक्रवार की सुबह पुलिस महानिदेशक रजनीश सेठ ने नायगांव में पर्यविक्षण अधिकारी पुलिस उपनिरीक्षक राणा परदेशी का पुष्प गुच्छ से अभिनंदन किया। ज्ञात हो कि पुलिस आयुक्तालय में डायल 112 प्रणाली को प्रभावी ढंग से लागू किया गया है। पिछले साल जनवरी से दिसंबर 2022 तक कमिश्नरेट में 34 हजार 987 कॉल आईं। पुलिस बल आमतौर पर 7 मिनट 34 सेकेंड में नागरिकों तक पहुंच जाता था,इसलिए 2022 में पुलिस कमिश्नरेट सबसे ऊपर था। फरवरी 2023 में पुलिस कमिश्नरेट का रिस्पांस टाइम 4 मिनट 9 सेकेंड था,जो फरवरी माह में भी सबसे ऊपर रहा।यह डायल प्रणाली सहायक पुलिस आयुक्त विनायक नरले के मार्गदर्शन में पर्यवेक्षण अधिकारी पुलिस उपनिरीक्षक राणा परदेशी, 65 मार्शल और 9 डिस्पैचर आदि उत्कृष्ट रूप से काम कर रहे है।



Scanned with CamScanner